पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ २७८ /२०१५
दिनांक : २७/०३/२०१५

प्रति,

मा.......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **०१/०४/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०१/०४/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - १६**

दिनांक : **०१/०४/२०१५** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०१/०४/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक १८/०३/२०१५ व २५/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१५) चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) मौजे औंध येथील राजीव गांधी उड्डाण पुला पासून ते मौजे ताथवडे-पुनावळे हद्दीपर्यंत ४५.०० मी. रुंद रस्ता विकास योजनेमध्ये प्रस्तावित असून सध्या जागेवर ४५.०० मी. रुंद रस्ता विकसित झालेला आहे. वाहतूक व दळणवळणाच्या नियोजनाकरीता ताथवडे – पुनावळे हद्दीपासून रावेत ते मुकाई चौक किवळे मुंबई – पुणे हायवे पर्यंत ४५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेबाबत स्थापत्य विभागाने मागणी केलेली आहे. या प्रस्तावाचे अनुषंगाने मंजूर विकास योजनेतील प्रस्तावित रस्ता रुंदी खालीलप्रमाणे आहे. १) ताथवडे पुनावळे हद्दीपासून पुनावळे रावेत पुलापर्यंत रस्ता रुंदी - ३०.०० मी. २) रावेत हद्दीपासून ते किवळे हद्दीपर्यंत रस्तारुंदी ३०.०० मी. व ३४.५० मी. ३) किवळे हद्दीपासून ते मुंबई पुणे हायवे पर्यंत रस्तारुंदी - ३०.०० मी. रावेत पुलापासून ते रावेत गावठाण हद्दीपर्यंत रस्तारुंदी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेनुसार ३४.५० मी. रस्तारुंदी प्रस्तावित केलेली आहे. स्थापत्य विभागाने केलेल्या मागणीनुसार वाहतुकीच्या दृष्टीकोनातून उक्त रस्त्याची रुंदी ४५.०० मी. करणे. भविष्यात होणा-या वाहतूकीच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. मंजूर विकास योजनेतील रस्तारुंदी वर उल्लेख केल्यानुसार ४५.०० मी. रुंद करण्याकरिता म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव सुरु करण्यास आणि सदर फेरबदल प्रस्तावावर प्राप्त हरकतधारकांना सुनावणी देऊन व त्यावर निर्णय घेऊन शासनास अहवाल सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ २७८ /२०१५
दिनांक : २७/०३/२०१५ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.